महाराष्ट्र शासन
आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन,महाराष्ट्र राज्य,
३४१, बांद्रा कुर्ला संकूल,रिझर्व्ह बँकेसमोर, बांद्रा (पूर्व),
मुंबई -४०० ०५१

Your Service is our Duty

दूरध्वनी क्र. ०२२ - २६५९०५४८ Email ID : : jchq.fda-mah@nic.in

जा.क्र. FDA-१३०१४(११)/८६/२०२६-D३१AC१५ दिनांक: स्वाक्षरीप्रमाणे

## आदेश

**विषय:** <u>औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम १९४५</u>
डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन (Prescription) मध्ये नमूद केलेल्या प्रमाणानुसार (Quantity) रुग्णांना औषधे पुरवठा करणेबाबत.

**संदर्भ:** १) प्रशासनाचे परिपत्रक दिनांक २९/०४/२००३.
२) प्रशासनाचे परिपत्रक दिनांक २१/०१/२०१६.

ज्याअर्थी, औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व नियम, १९४५ मधील नियम ६५ व ६७ अन्वये औषधांच्या विक्रीसंदर्भात विशिष्ट तरतुदी/नियम विहित करण्यात आले आहेत.

ज्याअर्थी, अनुसूची H, H१ व X अंतर्गत औषधाची नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाच्या प्रिस्क्रीप्शन अनुषंगे पुरवठा/विक्री करण्याबाबत विषयांकित कायद्यातील नियम ६५(९) अंतर्गत तरतूद आहे.

ज्याअर्थी, नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाच्या प्रिस्क्रीप्शन अंतर्गत रुग्णास देण्यात येणाऱ्या औषधांची एकूण संख्या व औषधाची मात्रा (Dose) नमूद करण्याबाबत नियमात तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.

ज्याअर्थी, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य हे औषधे व सौंदर्यप्रसाधने कायदा , १९४० व त्याअंतर्गत नियम, १९४५ ची अंमलबजावणी करण्याकरिता सक्षम प्राधिकरण आहे.

ज्याअर्थी, काही किरकोळ औषध विक्रेत्यांकडून नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकांनी प्रिस्क्रीप्शन मध्ये नमूद केलेल्या औषधांच्या संख्येपेक्षा अधिक अथवा संपूर्ण Strip/Pack खरेदी करण्याची रुग्णांना सक्ती केली जात असल्याबाबत नागरिकांकडून निवेदने व तक्रारी प्राप्त होत आहेत;

आणि ज्याअर्थी, संदर्भ क्र. १ व २ अन्वये, औषधांची Strip कापून, प्रिस्क्रीप्शन मध्ये नमूद केलेल्या संख्येप्रमाणे औषधांची विक्री करण्याबाबत यापूर्वीदेखील सूचना/निर्देश निर्गमित करण्यात आलेले आहेत;

त्याअर्थी, रुग्णहित, औषधांचा सुरक्षित वापर तसेच वैद्यकीय व्यवसायिकाच्या सल्ल्यानुसार प्रिस्क्रीप्शान अनुषंगे औषधाचा वापर/पुरवठा होण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र राज्यातील सर्व परवानेधारक किरकोळ औषध विक्रेत्यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१. नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायिकाने प्रिस्क्रीप्शान मध्ये नमूद केलेल्या औषधांचा Dose, Quantity व उपचाराचा कालावधी विचारात घेऊन, निर्देशित केल्याप्रमाणेच रुग्णास औषधे पुरवठा करण्यात यावा.

२. रुग्णाने प्रिस्क्रीप्शान नुसार आवश्यक संख्येने औषधाची मागणी केल्यास, औषधाची गुणवत्ता, ओळख, आवश्यक Label Particulars व Traceability अबाधित ठेवून Strip मधून आवश्यक तेवढ्या गोळ्या/कॅप्सूल उपलब्ध करून देण्याबाबत औषध विक्रेत्याने कार्यवाही करावी.

३. केवळ पूर्ण Strip/Pack विक्री करण्याच्या उद्देशाने, रुग्णास नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकाने प्रिस्क्रीप्शान मध्ये निर्देशित केलेल्या प्रमाणापेक्षा अधिक औषधे खरेदी करण्यास बाध्य करू नये. प्रिस्क्रीप्शान मध्ये नमूद केलेल्या प्रमाणात औषध देण्यास किंवा त्याची विक्री करण्यास नकार देऊ नये.

४. उपरोक्त प्रमाणे कोणताही औषध विक्रेता संपूर्ण Strip/Pack रुग्णास घेण्याची सक्ती करत असल्याचे निदर्शनास आल्यास विषयांकित कायद्यातील तरतुदीनुसार सक्त कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

:

Digitally signed by
TUKARAM H MUNDHE
Date: 24-08-2026
16:14:19

**तुकाराम मुंढे**, भा.प्र.से.
आयुक्त,
अन्न व औषध प्रशासन,
महाराष्ट्र राज्य

**प्रति,**
सर्व परवानेधारक किरकोळ औषध विक्रेते.

**प्रत:** १) सर्व सह आयुक्त (औषधे), सहाय्यक आयुक्त (औषधे) व औषध निरीक्षक, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य यांना उपरोक्त आदेशानुसार कार्यक्षेत्रात तक्रारी /उल्लन्घने होत असल्याचे निदर्शनास आल्यास कायदेशीर करावी घेण्याच्या निर्देशासह.

२) सह आयुक्त, औषधे (आयुक्तालय), तथा राज्य औषध नियंत्रक, महाराष्ट्र राज्य.